# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

## दिनांकः17.04.2025 वारःगुरुवार

---

- सर्वोच्च न्यायालयात वक्फ सुधारणा विधेयक २०२५बाबत आज सुनावणी सुरू राहणार. पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या हिंसाचाराबाबत सर्वोच्च न्यायालयाची चिंता..
- महाराष्ट्रात अमरावतीमध्ये अग्नेय आशियातली सर्वात मोठी वैमानिक प्रशिक्षण संस्था सुरू होणार
- अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी लादलेल्या वाढीव आयातशुल्कामुळे जगभरातील व्यापारात घट होण्याचा जागतिक व्यापार संघटनेचा अंदाज.
- यंदाचा लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार कुमार मंगलम बिर्ला यांना जाहीर
- आणि
- आयएसएसएफ विश्वकरंडक स्पर्धेत भारताचे इंदरसिंग सुरूची आणि सौरभ चौधरी यांना १० मीटर एअर पिस्तूल मिश्र प्रकारात सुवर्णपदक.

**<u>वक्फ विधेयक</u>**

सर्वोच्च न्यायालयात वक्फ सुधारणा विधेयक २०२५बाबत आज सुनावणी सुरू राहणार आहे. सर्वोच्च न्यायालयाचं तीन न्यायमूर्तींचं खंडपीठ काल या विधेयकाबाबत अंतरिम आदेश देणार होतं, मात्र खंडपीठानं विचारलेल्या तीन प्रश्नांची उत्तरं देण्यासाठी केंद्र सरकारनं वेळ मागून घेतल्यानं तो स्थगित करण्यात आला. सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना, न्यायमूर्ती संजयकुमार आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्यापुढे याबाबत सुनावणी सुरू आहे. वक्फ मंडळांचे आणि केंद्रीय वक्फ परिषदेचे सर्व सदस्य मुस्लिमच असायला हवेत, असा आदेश देणार असल्याचं खंडपीठानं स्पष्ट केलं.

दरम्यान, वक्फ कायद्यात सुधारणेवरून पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या हिंसाचाराबाबत न्यायमूर्ती खन्ना यांनी चिंता व्यक्त केली.

**<u>सरन्यायाधीशशिफारस</u>**

सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी देशाचे पुढचे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांच्या नावाची शिफारस केंद्रिय कायदा मंत्रालयाकडे केली आहे. न्यायमूर्ती गवई हे सर्वोच्च न्यायालयातले दुसऱ्या क्रमांकाचे वरीष्ठ न्यायमूर्ती आहेत. सध्याचे न्यायमूर्ती संजीव खन्ना यांचा कार्यकाळ पुढच्या महिन्याच्या १३ तारखेला संपणार आहे.

अमरावतीविमानतळ

अमरावती इथं सुरू केली जाणारी विमान उड्डाण प्रशिक्षण संस्था अग्नेय आशियातली सर्वात मोठी वैमानिक प्रशिक्षण संस्था ठरेल असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. अमरावती विमानतळ आणि उडान अर्थात उडे देश का आम नागरिक योजनेअंतर्गत अमरावती मुंबई प्रवासी विमानसेवेचा काल प्रारंभ करताना ते बोलत होते. दरवर्षी 180 वैमानिक अमरावतीमध्ये  तयार होतील आणि जवळपास ३४ विमानं या संस्थेत उपलब्ध असतील, असं मुख्यमंत्री म्हणाले.

गेल्या १० वर्षांत देशातल्या विमानतळांची संख्या, विमानं आणि हवाई वाहतूक मार्ग यांची संख्या जवळपास दुपट झाली आहे असं नागरी हवाई वाहतूक मंत्री के. राम मोहन नायडू, यांनी याप्रसंगी सांगितलं. तर २०१४ नंतर देशात ८६ नवीन विमानतळ सुरू झाल्याचं राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अमरावतीत विमानतळ सुरू होत असल्याचं स्वागत केलं आहे. या विमानतळामुळे या भागात अर्थव्यवस्थेला आणि दळणवळणाला चालना मिळेल, असं त्यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<u>आयमेक परिषद</u>**

बंदरं, बहुमार्गी वाहतूक आणि मैत्रीसारखे डिजिटल प्लॅटफॉर्म्स यांच्या विकासामुळे भारतात सागरी क्रांती होत असल्याचं केंद्रीय बंदरं, वाहतूक आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी म्हटलं आहे. भारत-मध्यपूर्व युरोप आर्थिक क्षेत्र म्हणजे आयमेक महापरिषदेत ते काल दिल्लीत बोलत होते. भारत जगातली सर्वांत वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियूष गोयल यांनी या महापरिषदेत म्हटलं आहे.

**<u>वड्रा चौकशी</u>**

सक्तवसुली संचालयनालय म्हणजे ईडी आज हरियाणातील जमीन व्यवहारातील कथित गैरव्यवहाराबाबत रॉबर्ट वड्रा यांची चौकशी करणार आहे. सलग तिसऱ्या दिवशी ही चौकशी होणार आहे. दिल्लीतल्या ईडी कार्यालयात ही चौकशी सुरू आहे. गुरुग्राममध्ये वड्रा यांच्या कंपनीनं एक जमीन खरेदी केल्याच्या प्रकरणात गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे.

**<u>पुरस्कार</u>**

यंदाचा लता दीनानाथ मंगेशकर पुरस्कार आदित्य बिर्ला समूहाचे अध्यक्ष पद्मविभूषण पुरस्कारानं सन्मानित कुमार मंगलम बिर्ला यांना त्यांचं दूरदर्शी नेतृत्व आणि भारताच्या विकासाच्या गाथेत दिलेल्या योगदानासाठी जाहीर करण्यात आला आहे. मास्टर दीनानाथ मंगेशकर यांच्या ८३ व्या स्मृतिदिनी मुंबईत २४ एप्रिलला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या हस्ते हा पुरस्कार दिला जाणार आहे. गुरु दीनानाथजींच्या समर्पण, उत्कृष्टता आणि सेवेच्या भावनेला मूर्त रूप देणाऱ्या व्यक्तिंना दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. हा उत्सव केवळ भूतकाळाला श्रद्धांजली नाही तर वर्तमान आणि भविष्याला दिलेली एक मशाल आहे, असं पंडित हृदयनाथ मंगेशकर यांनी पुरस्काराची घोषणा करताना काल मुंबईत सांगितलं.

अभिनेत्री श्रद्धा कपूर, सोनाली कुलकर्णी, अभिनेते सुनील शेट्टी, सचिन पिळगावकर, शरद पोंक्षे, गायिका रिवा राठोड, साहित्यिक श्रीपाल सबनीस, व्हायोलिनवादक डॉ. एन. राजम यांनाही विविध पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

**<u>जागतिक व्यापार</u>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी लादलेल्या वाढीव आयातशुल्कामुळे जगभरातील व्यापारात घट होईल, असा अंदाज जागतिक व्यापार संघटनेनं म्हणजे डब्ल्यूटीओनं व्यक्त केला आहे. या संघटनेनं २०२५ आणि २०२६ या वर्षांसाठीच्या व्यापाराचा अंदाज काल प्रसिद्ध केला. त्यात अमेरिका आणि चीनमधल्या व्यापार संघर्षाबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. डब्ल्यूटीओच्या महासंचालक नगोझी ओकोंजो-इविला यांनी याबाबत निवेदन प्रसिद्ध केलं आहे. अमेरिका आणि चीन यांच्यातला व्यापार ८१ टक्क्यांनी कमी होईल असं त्यांनी म्हटलं आहे. जगभरातील व्यापार २०२५मध्ये ० पूर्णांक २ दशांश टक्क्यांनी कमी होईल असा अंदाज त्यांनी व्यक्त केला आहे.

**<u>कॅलिफोर्निया खटला</u>**

दरम्यान, अमेरिकेतील कॅलिफोर्निया राज्य अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांच्यावर खटला दाखल करेल, असं कॅलिफोर्नियाचे गव्हर्नर गॅविन न्यूसोम यांनी जाहीर केलं आहे. ट्रंप यांनी विविध देशांवर वाढीव आयातशुल्क लादल्यामुळे कॅलिफोर्नियात भाववाढ होत असून बेरोजगारीचा धोका वाढत आहे, असं न्यूसोम यांनी समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. वाढीव आयातशुल्काचा सर्वात जास्त फटका कॅलिफोर्नियाला बसत असल्याचं त्यांनी नमूद केलं आहे.

**<u>अमेरिका उपाध्यक्ष दौरा</u>**

अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स येत्या २१ तारखेपासून भारताच्या चार दिवसांच्या दौऱ्यावर येत आहेत. व्हान्स यांचा हा पहिलाच भारत दौरा असल्याचं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे. या भेटीत व्हान्स २१ तारखेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत. व्हान्स जयपूर आणि आग्र्यालाही भेट देणार आहेत. या भेटीमुळे भारत-अमेरिका संबंधांमधील द्विपक्षीय संबंधांचा आढावा घेण्याची संधी मिळणार आहे.

**<u>बिहार चर्चा</u>**

बिहारमध्ये आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय जनता दल आणि कॉंग्रेस यांच्यासह सहा पक्षांची महत्त्वाची बैठक आज पाटण्यात होणार आहे. आरजेडीचे तेजस्वीप्रसाद यादव, कॉंग्रेसचे बिहारचे प्रभारी कृष्णा अल्लावारू, कॉंग्रेसचे बिहारचे प्रदेशाध्यक्ष राजेशकुमार, तसंच डाव्या पक्षांचे आणि विकासळील इन्सान पार्टीचे नेते बैठकीला उपस्थित राहणार आहेत. जागावाटपाबरोबर मुख्यमंत्रिपदाच्या चेहऱ्याबाबत बैठकीत चर्चा होणार आहे.

**<u>आयपीएल</u>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत दिल्ली कॅपिटल्सनं काल रात्री झालेल्या थरारक सामन्यात राजस्थान रॉयल्सचा पराभव केला. दिल्लीत अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सनं ५ गडी बाद

१८८ धावा केल्या. त्यानंतर राजस्थान रॉयल्सनं वीस षटकांमध्ये तेवढ्याच धावा केल्यानंतर सामना सुपर ओव्हरमध्ये गेला. स्टार्क स्टेलरच्या भेदक गोलंदाजीमुळे राजस्थान रॉयल्सचे शिमरॉन हेटम्येर ११ धावाच करू शकले. दिल्ली कॅपिटल्सच्या के. एल. राहुल आणि ट्रिस्टन स्टब्ज यांनी हा आकडा सहजपणे पार करत विजय मिळवला. दिल्ली कॅपिटल्सचा मायकेल स्टार्क याला सामनावीर घोषित करण्यात आलं. आज मुंबईत वानखेडे मैदानावर मुंबई इंडियन्सचा सामना सनरायझर्स हैदराबादशी होणार आहे.

**आयएसएसएफ**

जागतिक नेमबाजी संघटनेच्या म्हणजे आयएसएसएफच्या विश्वकरंडक स्पर्धेत भारताचे इंदरसिंग सुरूची आणि सौरभ चौधरी यांनी १० मीटर एअर पिस्तूल मिश्र प्रकारात सुवर्णपदक मिळवलं आहे. त्यांनी चीनच्या कियानझून याओ आणि कैहू यांचा १७-९ असा पराभव केला. पेरूतील लिमा इथं ही स्पर्धा सुरू आहे. आज महिलांच्या स्किट स्पर्धेत भारताची रायझा धिल्लों अंतिम स्पर्धेत कौशल्य दाखवणार आहे.

**हवामान अंदाज**

राजस्थान आणि गुजरातमध्ये उष्णतेची तीव्र लाट कायम राहील असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, केरळ आणि गुजरातमध्येही तापमान वाढतं राहील असं हवामान विभागानं म्हटलं आहे. बिहार, आसाम आणि मेघालयात मुसळधार पाऊस पडेल, तर सिक्कीम, झारखंड, ओडिशा, आसाममध्ये विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी उन्हाच्या झळांमध्ये वाढ झाली असून अनेक ठिकाणी कमाल तापमानानं चाळीशी ओलांडली आहे. राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान अकोल्यात ४३ पूर्णांक ७ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.